जा. क्र.आसंउकें/रामेश्वर/तंत्र/391/२०२२
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर.
मु. पो. विजयदुर्ग, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
दिनांक –04/07/२०२२

**प्रति,**

१. मा. तहसिलदार,
तहसिलदार कार्यालय, देवगड,
ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग.

२. मा. सरपंच,
ग्रामपंचायत कार्यालय, रामेश्वर,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

३. मा. सरपंच,
ग्रामपंचायत कार्यालय, विजयदुर्ग.

४. मा. सरपंच,
ग्रामपचांयत कार्यालय, गिर्ये,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

**विषय:— आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर येथील प्रक्षेत्रावर ठेका पध्दतीने काम करण्यासाठी इच्छुक ठेकेदारांनी दपत्रक देण्याबाबत...**

**महाशय,**

आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावरील कामासाठी काही कामसू सशक्त पुरुष/स्त्री मजूरांची ठेका पध्दतीने काम करण्यासाठी ०४ मजूराची आवश्यकता आहे. सोबत कामाचे स्वरुप दर्शविणारी माहिती जोडण्यात आली आहे. सदर काम करण्यास मजूर पुरविण्यास इच्छुक ठेकेदाराने आपण प्रति दिन काय दराने मजूर पुरवाल हे या कार्यालयास तयार केलेल्या पत्रकात विचारलेल्या इतर माहीतीसह दि. **२१/०७/२०२२** पर्यत बंद पाकीटातून कळवावे. कार्यालयात सद्या कार्यरत असलेल्या मजूराना प्राधान्य देण्यात येईल. कामासंबधी अटी व शर्ती ज्यांना मान्य असतील अशा कंत्राटी मजूरांनी/व्यक्तीनी दरपत्रके दयावयाची आहेत. सदर कामे **माहे ऑगस्ट** — २०२२ ते **माहे नोव्हेंबर** — २०२२ पर्यंतच्या कालावधीसाठी आहेत.

**आपला विश्वासू**

उद्यानविद्यावेत्ता
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर,
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.

प्रत: नोटीस बोर्ड, आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर.

# ठेकापध्दतीने करावयाच्या कामासाठीचे शर्ती व अटी

१. ठेक्यातील कामे ही ठेकेदारांनी संबंधीत कृषि पर्यवेक्षक/कृषि सहाय्यक यांचे सूचनेनुसार समाधानकारकरित्या करावयाची आहेत.
२. अर्धवट व असामाधानकारक कामाचे देयक पारित केले जाणार नाही
३. प्रक्षेत्रावरील कामे करणेसाठी लागणारी हत्यारे ठेकेदारांनी स्वतः पुरविणेची आहेत.
४. फवारणी पंप, पाणी, बुरशीनाशके तणनाशके इत्यादी साधने या कार्यालयाकडून दिली जातील.
५. ठेक्याची कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करणे/चालूठेवणे बंधनकारक आहे.
६. ठेक्याची कामे करताना प्रक्षेत्रातील इतर लागवड व इमारतीला इजा/नुकसान झाल्यास त्यांची भरपाई करुन घेतली जाईल.
७. ठेक्याच्या कामगारांना काम करताना अपघात किंवा इजा झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदरावर राहील.
८. ठेक्यातील कामगारांना भविष्यात विद्यापीठ सेवेत सामावुन घेण्याबाबत कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.
९. ठेक्याचे काम समाधनकारक रित्या झाल्यानंतर चालू कामाचे /पूर्ण कामाचे कामाच्या प्रमाणात देयक या कार्यालयाकडून प्रत्येक महिन्याच्या १५ ते २० व १ ते ५ तारखेदरम्यान अदा करण्यात येईल.
१०.आर्थिक वर्षात आपले उत्पन्न प्रमाणित उत्पन्नापेक्षा अधिक असल्यास आपणांस नियमानुसार टी. डी. एस. व आयकर भरावा लागेल.
११.कामाच्या स्वरुपामध्ये परिस्थितीनुरुप बदल करावयाचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवले आहेत.
१२.एक किंवा सर्व दरपत्रके स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवले आहेत

उद्यानविद्यावेत्ता
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर,
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.